महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समितीस सन २०१७-२०१८ मधील निधी उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन ज्ञापन क्रमांकः संकीर्ण-१११९/(प्र.क्र.१५१/१६)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २२ मार्च, २०१८.

वाचा- १. शासन निर्णय क्र.संकीर्ण-१११९/(प्र.क्र.८१/१६)/समन्वय दि.१७.१०.२०१६.
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/ २०१८/(मसगाचसाप्रस/संपादन लेखन/प्रशा-३/३३८५, दि.१६ मार्च, २०१८.

प्रस्तावना :-

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे साहित्य प्रकाशित करण्यासाठी संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली आहे. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे साहित्य प्रकाशित करण्यासाठी डॉ. रमेश वरखेडे, डॉ. एकनाथ पगार, प्रा.अविनाश सप्रे, श्री. बाबा भांड व संचालक, सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था यांचेकडून लेखन व संपादन या कामासाठी एकूण रु.२७,६२,४९३/- (रुपये सत्तावीस लाख बासष्ट हजार चारशे त्र्याण्णव फक्त) इतक्या खर्चाचे देयक अद्याप अदा केले नसल्याबाबत प्रमाणित करुन, सदर खर्चास मंजूरी देण्याची विनंती केली आहे. सदर खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

ज्ञापन :- अधिदान व लेखाधिकारी यांना कळविण्यात येते की, महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे लेखन व संपादन या कामासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे झालेला खर्च रु.२७,६२,४९३/- (रुपये सत्तावीस लाख बासष्ट हजार चारशे त्र्याण्णव फक्त) इतक्या खर्चास शासन मंजूरी देण्यात येत आहे. :-

अ.क्र.	विवरण	पावती क्रमांक	दिनांक	रुपये
१.	महाराजा सयाजीराव गायकवाड भाषण संग्रह भाग-१ व २ चे संपादन व लेखन (डॉ. रमेश वरखेडे).	१	०९/०२/२०१८	३,०९,६००/-
२.	महाराजा सयाजीराव गायकवाड मराठी पत्रसंग्रह भाग १ ते ३ चे संपादन व लेखन (डॉ. एकनाथ पगार).	२	०९/०२/२०१८	५,१९,६००/-

३	महाराजा सयाजीराव गायकवाड इंग्रजी भाषण संग्रह भाग १ व २ चे संपादन व लेखन (प्रा. अविनाश सप्रे).	३	०९/०२/२०१८	२,७९,६००/-
४	महाराजा सयाजीराव गायकवाड इंग्रजी पत्रसंग्रह भाग १ ते ४ चे संपादन व लेखन (डॉ. एकनाथ पगार).	४	०९/०२/२०१८	६,१९,२००/-
५	महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची संपादन व लेखन (बाबा साळूबा भांड).	५	०९/०२/२०१८	२,०७,६००/-
६	अनुवादाचे काम (संचालक, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था).	६	०९/०२/२०१८	८,२६,८९३/-
			एकूण	**२७,६२,४९३/-**

२. सदर खर्च मागणी क्र. २२०५ कला व संस्कृती, ८०० इतर खर्च, (०१) समिती व समारंभ (०१) (०३) थोर राष्ट्रीय पुरुषांच्या साहित्याचे प्रकाशन (२२०५ ३१४३) या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ च्या मंजूर रु.८०० लक्ष तरतूदीतून खालील तकत्यातील स्तंभ - ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु.२७,६२,४९३/- (रुपये सत्तावीस लाख बासष्ट हजार चारशे त्र्याण्णव फक्त) इतका निधी खर्च करण्यात यावा. :-

(रुपये हजारात)

अ. क्र.	लेखाशिर्ष	उद्दिष्ट	अर्थसंकल्पित तरतूद	वितरीत केलेला निधी	शिल्लक निधी	वितरीत करावयाचा निधी
१	२	३	४	५	६	७
१	मागणी क्रमांक: डब्ल्यू-४, २२०५, कला व संस्कृती, ८०० इतर खर्च, (०१) समित्या व समारंभ, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०१) (०३) थोर	०६-दूरध्वनी, वीज व पाणी	३००	१००	२००	०
२		१०-कंत्राटी सेवा	२००	१००	१००	०
३		११-देशांतर्गत प्रवास खर्च	८००	२५१	५४९	०
४		१३-कार्यालयीन खर्च	५५००	२५००	३०००	०

५	राष्ट्रीय पुरुषांच्या साहित्याचे प्रकाशन (२२०५३१४३).	१६- प्रकाशने	७००००	३८५७८.०९७	३१४२१.९०३	२७६२.४९३
६		२८- व्यावसायिक - सेवा	२००	००१	१९९	०
७		५२- यंत्रसामुग्री व साधनसामुग्री	३०००	१००	२९००	०
	एकूण		८००००	**४१६३०.०९७**	**३८३६९.९०३**	**२७६२.४९३**

३. उपरोक्त खर्च करण्यास सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, औरंगाबाद यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यता येत आहे.

४. सदर ज्ञापन वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दि.१७.४.२०१५ चे वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग तीन मधील अनुक्रमांक ३, परिच्छेद क्र.१६६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत असून, या शासन निर्णयातील तरतूदींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

५. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्रमांक असा २०१८०३२३११२४४६७६०८ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Kharat

Digitally signed by Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f8cb550124237 27bece629d954713c1ec2962a9ca9b909643170e56321cfd24, cn=Siddharth Kharat
Date: 2018.03.23 11:26:31 +05'30'

(सिध्दार्थ खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.विरोधीपक्ष नेता (विधानसभा/विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, विधानमंडळ, मुंबई.
४) अप्पर मुख्य सचिव (उ. व तं. शि. विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (कार्यासन विघयो), मंत्रालय, मुंबई.

६) वित्त विभाग (व्यय- ५, अर्थ- ८), मंत्रालय, मुंबई.

७) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

८) सह संचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण संचालनालय, औरंगाबाद.

९) महालेखापाल (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -I, II मुंबई, नागपूर.

१०) संचालक, लेखा व कोषागारे, औरंगाबाद.

११) अधिदान व लेखाअधिकारी, औरंगाबाद.

१२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, औरंगाबाद.

१३) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद.

१४) सदस्य-सचिव, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद.

१५) कक्ष अधिकारी (साशि-१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१६) निवड नस्ती (समन्वय).